मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 29 नोव्हेंबर 2024 | पान- 1

# महापालिकेच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

## थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रगत विचारांचा वारसा सर्वांनी जोपासावा : अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले



**पिंपरी | प्रतिनिधी**

स्त्री शिक्षण, समानता आणि सत्यासाठी आपले आयुष्य व्यतीत करणारे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले हे भारतातील सामाजिक सुधारणा चळवळीचे प्रणेते मानले जातात, त्यांचे प्रती कृतज्ञता व्यक्त करून अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रगत विचारांचा वारसा सर्वांनी जोपासावा असे मत व्यक्त केले.

क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील त्यांच्या प्रतिमेस तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारकामधील त्यांच्या पुतळ्यास अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

मुख्य प्रशासकीय इमारतीमधील कार्यक्रमास विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, उद्यान अधिक्षक योगेश वाळुंज, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे तर ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक आणि विचार प्रबोधन पर्व येथील कार्यक्रमास माजी स्थायी समिती सभापती संतोष लोंढे, हिरामण भुजबळ, रामभाऊ दरवडे, तुकाराम गायकवाड, विलास लोंढे, किरण लोंढे, शेखर वाघ, प्रदीप पवार, संतोष सोनवणे चंद्रवदन बगाडे, कविता खराडे, रचना गायकवाड, जनसंपर्क विभागाचे देवेंद्र मोरे ,किसन केंगळे, अभिजीत डोळस, विकास गायकांबळे, आणि सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# चिंचवडमध्ये चोरीच्या घटनांमध्ये वाढ

## नाकाबंदी, पेट्रोलिंग गस्त वाढविण्याची नाना काटे यांची मागणी



**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड मतदार संघातील वाकड, पिंपळे सौदागर थेरगाव, पिंपळे निलख, सांगवी परिसरातील पोलीस ठाणे हद्दीत गेल्या अनेक दिवसांपासून दागिने, मोबाईल हिसकावने, पाकीट मारणे, घरफोडी, चोरीच्या व इतर घटनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून पोलिसांकडून पेट्रोलिंग, गस्त वाढविण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नाना काटे यांनी केली आहे.

नाना काटे यांनी सांगवी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना या संदर्भात निवेदन दिले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, चिंचवड मतदार संघातील वाकड, पिंपळे सौदागर थेरगाव, पिंपळे निलख, सांगवी परिसरातील पोलीस ठाणे हद्दीत गेल्या अनेक दिवसांपासून दागिने, मोबाईल हिसकावने, पाकीट मारणे, घरफोडी, चोरीच्या व इतर घटनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. हा प्रकार नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर बाब आहे. या परिसरात मोठ्या प्रमाणात उच्चभ्रु सोसायट्या आहेत. त्यातील नागरिक वॉकिंग, खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात येत असतात. तसेच इथे छोटे मोठे हॉटेल व इतर व्यवसाय असून, रात्री त्यातील कामगार, मालक घरी परतत असताना त्यांना या चोरट्यांकडून धारदार हत्यार किंवा बंदुकीच्या धाकाने त्यांच्याकडील मोबाईल, पर्स, दागिने व बाकीचे ऐवज लुटले जातात.

त्यामुळे या परिसरातील नागरिकांमध्ये सध्या दहशत व भीतीचे वातावरण निर्माण होत असून ही खूप गंभीर बाब आहे. तरी या प्रकाराकडे गांभीर्याने दखल घेऊन, योग्य त्या उपाययोजना कराव्यात. तसेच चिंचवड मतदार संघातील या परिसरात नाकाबंदी व पेट्रोलिंग गस्त वाढविण्यात यावी. आणि चोरीच्या घटनांवर नियंत्रण आणावे अशी मागणी नाना काटे यांनी केली आहे.

# पिंपरी चिंचवड ॲडव्होकेटस् बार असोसिएशनची निवडणूक शनिवारी

## निवडणुकीपूर्वीच अध्यक्षपदी ॲड. गौरव वाळुंज आणि सचिव पदी ॲड. उमेश खंदारे बिनविरोध




**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड ॲडव्होकेटस् बार असोसिएशनची सन २०२४-२५ ची निवडणूक शनिवार, दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ रोजी पार पडणार असून जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमा अन्वये आज (दि.२८) रोजी अनेक उमेदवारांनी माघार घेतली असल्याने पिंपरी चिंचवड ॲडव्होकेटस् बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड. गौरव वाळुंज तर सचिव पदी ॲड. उमेश खंदारे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

सदर निवडणुकीसाठी अध्यक्ष व सचिव पदासाठी प्रत्येकी दोन अर्ज दाखल झाले होते. यामधील अध्यक्ष पदाचे उमेदवार ॲड. मुकुंद ओव्हाळ तर सचिव पदाचे उमेदवार ॲड. गणेश राऊत यांनी अर्ज मागे घेतल्याने अध्यक्ष व सचिव या दोन मुख्य पदांची निवडणूक बिनविरोध झाली आहे.

याचबरोबर कार्यकारिणीतील महिला सचिव पदी ॲड. रीना मगदूम, सह-सचिव पदी ॲड. राकेश जैद, खजिनदार पदी ॲड. अक्षय फुगे, हिशोब तपासणीस पदी ॲड. शंकर घंगाळे, तर सदस्य पदी ॲड. विकास शर्मा, ॲड. संघर्ष सूर्यवंशी, ॲड. मानसी उदासी, ॲड. संकेत सरोदे, ॲड. राजेश राजपुरोहित, ॲड. सीमा शर्मा यांची सुद्धा बिनविरोध निवड झाली असून कार्यकारिणीतील फक्त उपाध्यक्ष या पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. उपाध्यक्ष पदासाठी ॲड. अनिल पवार, ॲड. अतुल कांबळे व ॲड. पल्लवी विट्ठे यांच्यात तिरंगी लढत होणार आहे.

सदर निवडणुकीसाठी विद्यमान अध्यक्ष ॲड. रामराजे जी. भोसले पाटील आणि कार्यकारिणी द्वारे ॲड. सुशील मंचरकर यांची मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली असून ॲड. संगीता परब, ॲड. शंकर पल्ले, ॲड. वैभव कल्याणकर यांची निवडणूक अधिकारी सहायक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

तसेच सदर निवडणूक ही बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाच्या नियमानुसार व त्यांनी नेमलेले निरीक्षक ॲड. श्रीकांत अगस्ते यांच्या नेतृत्वाखाली शनिवार, दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ रोजी नेहरूनगर, पिंपरी न्यायालयात सकाळी १० ते सायंकाळी ०५:३० वाजता होणार आहे. यामध्ये पिंपरी - चिंचवड ॲडव्होकेटस् बार असोसिएशनच्या सर्व सभासदांनी मतदान प्रक्रियेत सहभागी होऊन मतदान करावे, असे आवाहन बार असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे.

# महापालिका निवडणूक होणार की लांबणार?

## प्रभागरचनेचा घोळ आणि ओबीसी राजकीय आरक्षण हे मुद्दे न्यायालयीन प्रक्रियेत अडकल्याने विलंब

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या सभागृहाची मुदत मार्च २०२२ मध्ये संपली आहे. त्यातच तीन की चार वॉर्डच्या प्रभागरचनेचा घोळ आणि ओबीसी राजकीय आरक्षण हे मुद्दे न्यायालयीन प्रक्रियेत आहेत. त्यामुळे महापालिका निवडणूक झालेली नाही. गेल्या २० महिन्यांपासून प्रशासक राज सुरू आहे. परंतु, विधानसभा निवडणुकीचा निकाल पाहता भाजपाप्रणीत महायुतीला एक हाती सत्ता आल्याने नवे राज्य सरकार महापालिका निवडणूक घेणार की तांत्रिक मुद्यांमुळे लांबणार अशी चर्चा आता सुरू आहे.

राजकीय तज्ज्ञ आणि कायदेतज्ज्ञांच्या मते, एप्रिल २०२५ पर्यंत निवडणुकीची घोषणा होऊ शकते. महापालिका निवडणुकांमुळेच दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक वेळेत जाहीर करण्यात आल्याची चर्चा आहे. फेब्रुवारी महिन्यांत परीक्षा सुरू होत आहेत. त्यामुळे एप्रिल महिन्यात महापालिका निवडणूक होऊ शकेल, असा अंदाज राजकीय नेते व्यक्त करीत आहेत.




### तीन की चार प्रभागांबाबत सत्ताधाऱ्यांचे एकमत?

» महापालिका निवडणुकीसाठी किती वॉर्डांचा प्रभाग असायला हवा याबाबत राजकीय मतभेद आहेत. चार वॉर्डचा मिळून एक प्रभाग असावा, अशी भूमिका भाजपने पूर्वी मांडलेली आहे. तर दोन वॉर्डचा मिळून एक प्रभाग असावा, असे राष्ट्रवादी काँग्रेसने म्हटले आहे. आता महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेस सहभागी असल्याने महापालिका निवडणूक एकत्र लढविली गेल्यास प्रभागरचनेवरून वादाची शक्यता कमी आहे, परंतु स्वतंत्र लढण्याचा निर्णय झाला तर या मुद्यावरून वाद होऊ शकतात, अशी चर्चा आहे.

महापालिका निवडणूक तांत्रिक प्रक्रियेमुळे तीन वर्षांपासून रखडली आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीवेळीच आयोगाने महापालिकेकडून लोकसंख्या तसेच समाविष्ट गावे आदींची मागणी मागविली होती. तसेच, लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांमध्ये आपापल्या प्रभागात मतदान वाढविणाऱ्यांनाच महापालिकेत उमेदवारी दिली जाईल. त्यामुळे पक्षाचे काम करा, असे राजकीय पक्षांकडून सांगण्यात आले होते. त्यामुळे विधानसभा निवडणुकीनंतर महापालिकेची निवडणूक होणार, अशी चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका निवडणुकांसाठी इच्छुकांकडून चाचपणीही केली जात आहे. त्यातच महायुतीचे सरकार आल्यामुळे चार वॉर्डांचा मिळून एक प्रभाग या पद्धतीने महापालिका निवडणुका होण्याची दाट शक्यता आहे.

महापालिकेची प्रभागरचना यासह मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण याबाबतच्या याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल आहेत. त्यावरील निर्णय प्रलंबित आहेत. जनतेचे विधानसभेत महायुतीच्या बाजूने कौल दिल्याने महायुतीचे सरकार या याचिका निकाली काढण्यासाठी प्रयत्न करतील आणि पालिका निवडणूक वेळेत होइल, अशी अपेक्षा इच्छुकांकडून व्यक्त केली जात आहे.

### स्थायी समितीकडून 400 कोटींचे प्रस्ताव मंजूर

» २०२४ मध्ये लोकसभा आणि राज्याची विधानसभा निवडणूक झाली. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता तीन महिने होती. त्यामुळे नवीन आर्थिक वर्ष सुरू झाल्यानंतर महापालिका प्रशासनाला कोणतेही काम करता आले नाही. तसेच बरेच कर्मचारी लोकसभेच्या कामासाठी नियुक्त केल्याने काम ठप्प झाले. त्यानंतर जून ते ऑक्टोबरदरम्यान महापालिकेचे कामकाज झाले. त्यात देखभाल-दुरुस्तीच्या कामाच्या निविदा, उड्डाणपूल, भुयारी मार्ग, आपत्ती व्यवस्थापन, पथ, घनकचरा विभागाच्या शेकडो कोटी रुपयांच्या निविदा मंजूर केल्या. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी अखेरच्या स्थायी समितीच्या बैठकीत सुमारे ४०० कोटींचे प्रस्ताव मंजूर झाले होते.

# पुण्यासह राज्यात 'हेल्मेटसक्ती'? दुचाकी चालकासह पाठीमागे बसणाऱ्याला हेल्मेट वापरणे बंधनकारक

## वाहतूक विभागाच्या अतिरिक्त पोलीस महासंचालक कार्यालयाने पाठवले पत्र, डोक्यावर हेल्मेट नसल्यास त्याची वेगवेगळी दंड आकारणी होणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-मुंबई-ठाणे-नाशिक आदी मोठ्या शहरांसह राज्यात सर्वत्र 'हेल्मेट सक्ती' लागू केली जाण्याची शक्यता आहे. राज्यातील रस्ते अपघातांमध्ये सर्वाधिक मृत्यू हे दुचाकी चालक आणि दुचाकीवर पाठीमागे बसलेल्या प्रवाशांचे होत असल्याचे समोर आले आहे.

पुणे-मुंबई-ठाणे-नाशिक आदी मोठ्या शहरांसह राज्यात सर्वत्र 'हेल्मेट सक्ती' लागू केली जाण्याची शक्यता आहे. राज्यातील रस्ते अपघातांमध्ये सर्वाधिक मृत्यू हे दुचाकी चालक आणि दुचाकीवर पाठीमागे बसलेल्या प्रवाशांचे होत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे अधिकाधिक प्रभावीपणे हेल्मेट कारवाई करण्याच्या सूचना राज्याच्या वाहतूक विभागाच्या अतिरिक्त पोलीस महासंचालक कार्यालयाने सर्व आयुक्तालये आणि अधीक्षक कार्यालयांना दिल्या आहेत. यासोबतच दुचाकी चालक आणि पाठीमागे बसलेला प्रवासी यापैकी कोणाच्याही डोक्यावर हेल्मेट नसल्यास त्याची वेगवेगळी दंड आकारणी होणार आहे. त्यामुळे आगामी काळात हेल्मेट कारवाईचा बगडा वाहतूक पोलिसांकडून उगारला जाण्याची शक्यता आहे.



वाहतूक विभागाच्या अतिरिक्त पोलीस महासंचालक कार्यालयाने अधीक्षक साळवे यांच्या स्वाक्षरीने पाठवलेल्या या पत्रानुसार, महाराष्ट्रामध्ये मागील पाच वर्षातील रस्ते अपघातांचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, विना हेल्मेट दुचाकीस्वार व पाठीमागे बसून प्रवास करणारे प्रवासी यांच्या अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसत आहे. तसेच, त्यांच्या मृत्यू आणि गंभीर जखमी होण्याच्या प्रमाणात देखील वाढ झालेली आहे. यासोबतच मोटर व्हेईकल कायदा १९८८ चे कलम १२८ आणि १२९ च्या तरतुदीप्रमाणे विना हेल्मेट दुचाकीस्वार व प्रवासी यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पोलीस घटकांकडून प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येत असल्याचे या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या रस्ते सुरक्षा समितीने दिलेले उद्दिष्ट व सूचनांची माहिती संबधित सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना देण्यात यावी. तसेच, मोटर व्हेईकल कायदा १९८८ चे कलम १२८ आणि १२९ ची प्रभावीपणे व कडक अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच, वाहतूक केसेस करण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या 'ई चालान' मशिनमध्ये आवश्यक बदल करून घेण्यात यावेत. त्यामध्ये विना हेल्मेट दुचाकीस्वार आणि विना हेल्मेट प्रवासी अशा दोन्ही केसेसची कारवाई एकाच हेडखाली न करता वेगवेगळी कारवाई केली जावी.

त्यामुळे आगामी काळात पुण्यात वाहतूक पोलीस हेल्मेट कारवाई वाढविण्याची शक्यता आहे. पुण्यात नेहमीच हेल्मेट सक्तीविरोधात आंदोलने उभी राहिलेली आहेत. पुणेकरांनी अनेकदा ही हेल्मेट सक्ती उधळून लावली होती. आता नव्याने होऊ घातलेल्या सक्तीला पुणेकर कसे तोंड देणार याकडे लक्ष लागले आहे.

### प्रभावीपणे कारवाई करण्याच्या सूचना

» त्याकरिता 'ई चालान' मशिनमध्ये मोटर व्हेईकल कायदा कलम १२९/१९४ (ड) या शिर्षकामध्ये बदल करण्यात आल्याचेर देखील कळवण्यात आले आहे. त्यामुळे यापुढे दोन वेगवेगळे हेडखाली कडक व प्रभावीपणे कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे अपघाती मृत्यू आणि गंभीर जखमींची संख्या कमी होण्यास मदत होईल असेही नमूद करण्यात आले आहे.

# पिंपरी-चिंचवडवासियांचा श्वास कोंडला; हवेची गुणवत्ता ढासळली

## पिंपरी-चिंचवडची हवा खराब श्रेणीत गेल्याचे दिसून येत आहे. परिणामी पिंपरी-चिंचवडवासियांमध्ये श्वसनसंस्थेच्या आजारांत वाढ

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिवाळा सुरु झाल्याने थंडी वाढू लागली आहे. शहरावर दाट धुक्याची चादर पसरली जात आहे. त्यातच शहरातील काही भागात प्रदूषणामुळे पिंपरी-चिंचवडची हवा खराब श्रेणीत गेल्याचे दिसून येत आहे. परिणामी पिंपरी-चिंचवडवासियांमध्ये श्वसनसंस्थेच्या आजारांत वाढ झाली आहे.

भोसरी, थेरगाव, पिंपरीसारख्या भागात सकाळी हवा गुणवत्ता निर्देशांक २००-२५० पेक्षा अधिक नोंदविला जात आहे. हवेची गुणवत्ता खराब श्रेणीत गेल्याने श्वासोच्छवास, फुफ्फुसांचे विकार असलेल्या रुग्णांना अनेक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. मात्र, हवा शुद्ध करण्यासाठी महापालिकेकडून विविध उपाययोजना राबविल्या जात असतात. त्या यंत्रणादेखील फेल ठरु लागल्याचे दिसून येत आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात दिवाळीमध्ये मोठ्या प्रमाणात हवा प्रदूषण वाढल्याचे पाहायला मिळाले होते. फटाक्यांच्या धुरापासून रुग्णांना त्रास झाल्याचे समोर आले होते. परंतु, त्यानंतर वातावरणातील बदल, वाढणारी थंडी आणि अन्य वायू प्रदूषणामुळे पुन्हा शहरातील प्रदुषणाची पातळी वाढली आहे.

हवा गुणवत्ता निर्देशांक ५० पर्यंत असणे आवश्यक आहे. त्यापेक्षा अधिक प्रदूषण वाढल्यास त्याचे आरोग्यावर परिणाम होतात. शहरातील काही भागात मागील काही दिवसात सकाळी हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) १५० ते ३०० च्या जवळपास नोंदवला गेला. यामध्ये भोसरीतील खंडेवस्ती येथे २७९, थेरगाव परिसरात ३०६, पिंपरी कॉलनी परिसरात २३९, तर वाकडमध्ये १५३ असल्याचे दिसून आले.

खराब श्रेणीत पोहोचलेली शहराची हवा शहरवासियांच्या आरोग्यावर परिणामकारक ठरत आहे. त्यातून श्वसनविकाराचा धोका वाढत आहे. तसेच, अस्थमा, सीओपीडी, इतर फुफ्फुसांच्या विकार असलेल्या रुग्णांना याचा मोठा त्रास होतो. या दिवसांमध्ये श्वसनविकाराच्या रुग्णांनी योग्य काळजी घ्यावी. तसेच, लक्षणे वाढताच तातडीने डॉक्टरांचा सल्ला घेण्याचे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांकडून केले जात आहे. हवा प्रदूषण कमी करण्यास महापालिका प्रशासन अपयशी ठरत असून केलेल्या उपाययोजना नावालाच असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमींकडून होत आहे.



### श्वसनाच्या रुग्णांमध्ये सतत वाढ

» महापालिका वैद्यकीय विभागाकडील सलग तीन वर्षांच्या आकडेवारीवरून शहरात प्रदूषणामुळे श्वसनाच्या रुग्णसंख्येत सतत भर पडत असल्याचे दिसून येते. २०२०-२१ या वर्षात अशा विकारांचे फक्त ३६१ रुग्ण होते. दुसऱ्याच वर्षी २०२१-२२ तीनपट वाढ होऊन १,३०१, तर २०२२-२३ मध्ये ही रुग्णसंख्या २,३२१ पर्यंत पोहोचली. सतत वाढणाऱ्या प्रदूषामुळे यात आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

> थंडी आणि अन्य वायुप्रदूषणामुळे श्वसन विकाराचा धोका वाढतो. दम्याच्या रुग्णांसह या दिवसांमध्ये सामान्य नागरिकांना काळजी घ्यावी. बाहेर पडताना मास्कचा वापर करावा. श्वसनाशी संबधित आजारांचा प्रतिकार करण्यासाठी योग्य आहाराचे संतुलन ठेवणे गरजेचे आहे.
>
> **- डॉ. शिवाजी ढगे, सहायक आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका**

> हवा प्रदूषणवाढीमुळे शहरात श्वसनसंस्थेच्या आजारांमध्ये वाढ होत आहे. रुग्णांना श्वासोच्छवास, फुफ्फूसांचे विकार होत आहेत. शहरवासियांना एकप्रकारे विषारी ऑक्सिजन घ्यावा लागत आहे. हे चित्र शहरातील हवा गुणवत्ता निर्देशांकावरून पाहायला मिळत आहे. प्रशासन प्रदूषण कमी करण्यात अपयशी ठरत आहे.
>
> **- प्रशांत राऊळ, पर्यावरणप्रेमी**

# दाखले रखडल्याने अर्जदारांची तहसील कार्यालयात धाव

## निवडणूक कामामुळे वाढली तहसीलदारांसमोरील प्रलंबित कामे; ज्येष्ठ नागरिक, महिला ताटकळल्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

नागरिकांना शासकीय कामासह शालेय प्रवेशासाठी आवश्यक दाखले वेळेवर मिळत नसल्याने अर्जदारांनी तहसील कार्यालयात सोमवारी धाव घेतली. तहसीलदारांच्या दालनाबाहेर गर्दी झाल्यानंतर अखेर विविध प्रकारचे दाखले पूर्ण करण्याबाबत सूचना देण्यात आले. गेल्या महिनाभरापासून तहसीलदार, नायब तहसीलदार यांना इलेक्शन ड्युटीमुळे शेकडो दाखले प्रलंबित असल्याचे सांगण्यात येत आहे.

पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालयांतर्गत उत्पन्न, डोमीसाइल त्याचप्रमाणे विविध दाखल्यांचे वाटप करण्यात येते. त्याचप्रमाणे सातबारा, विविध प्रकारच्या सुनावणी आणि योजनांचा परतावाही अर्जदारांना मिळाला नव्हता. दरम्यान, गृह प्रकल्पासाठी लागणारा उत्पन्न दाखला, डोमीसाइल सर्टिफिकेट यासह विविध प्रमाणपत्रे देण्यात येतात. मात्र, गेल्या महिन्याभरापासून तहसीलदार निवडणुकीच्या कामामुळे व्यस्त असल्याने हे दाखले रखडले होते. त्याचप्रमाणे इतर दाखल्यांची संख्या देखील वाढली होती. नागरिक यासाठी हेलपाटे मारत होते. मात्र, निवडणुकीचे कारण त्यांना दिले जात होते.

दरम्यान, सोमवारी (दि.२५ ) सकाळीच विविध दाखले मिळावेत यासाठी, नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. तहसीलदार यांच्या दालनासमोरच नागरिक येऊन थांबले होते. त्यानंतर नायब तहसीलदार यांची भेट घेऊन दाखले देण्यात यावेत, अशी मागणी काही नागरिकांनी केली. त्यानंतर नायब तहसीलदार स्वतः बाहेर आले आणि त्यांनी नागरिकांना दोन ते तीन दिवसांमध्ये दाखले देण्यात येतील, असे सांगितले. त्यानंतर गर्दी काही प्रमाणात कमी झाली. दररोज जवळपास दीडशे ते दोनशे विविध प्रकारचे अर्ज येतात. गेल्या महिन्याभरापासून हे दाखले रखडल्याने तो आकडा जवळपास हजारांच्या घरात गेला असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्याचबरोबर नागरिकांच्या विविध तंट्यातील सुनावण्या, सातबारे आणि महसूल संदर्भातील कामे देखील रखडली होती. त्यामुळे तहसील कार्यालय दिवसभर नागरिकांची गर्दी दिसून आली. याचबरोबर संजय गांधी, श्रावणबाळ अशा विविध योजनांसाठी नागरिक आले होते. या ठिकाणी असलेले अधिकारी कर्मचारी निवडणूक कामासाठी गेले होते. ते पुन्हा आल्यानंतर अर्जाची माहिती घेण्यासाठी नागरिक येत होते. आळंदी यात्रेनिमित्त नियोजन आणि विविध प्रकारच्या सुरक्षितेसाठी जिल्हाधिकाऱ्याकडून महसूल अधिकाऱ्यांना कामे सोपवण्यात आली आहेत. त्यासाठी या कार्यालयातील अधिकारी तिथे जाऊ शकतात. त्यामुळे मंगळवारीही नागरिकांना अधिकारी भेटू शकणार नाहीत. त्यामुळे दाखल्यास इतर कामे आणखी लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



### शिधापत्रिका कार्यालय रिकामे

» शिधापत्रिकेतील नागरिकांची प्रलंबित कामे आणि धान्य मिळत नसल्याच्या तक्रारीबाबत नागरिक आले होते. मात्र, निगडी येथील शिधापत्रिका कार्यालयामध्ये केवळ दोनच कर्मचारी उपलब्ध होते. अन्य अधिकारी निवडणुकीच्या कामांमध्ये असल्याचे सांगण्यात आले. त्याचप्रमाणे कर्मचारी देखील दरवाजाला कडी लावून आत बसले होते. त्यामुळे बाहेर ताटकळत थांबलेले नागरिक कोणी उत्तर देत नसल्याने निघून गेले.

> निवडणुकीच्या कामामुळे थोडेफार दाखले प्रलंबित आहेत. मात्र, नागरिकांची गैरसोय लक्षात घेता ते लवकरात लवकर देण्यात येतील.
>
> **- जयराज देशमुख, अप्पर तहसीलदार, पिंपरी-चिंचवड**

# अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग ॲक्शन मोडवर

## पुढील आठवड्यापासून कारवाईला सुरुवात, पीएमआरडीएने पाठवली दहा हजारांहून अधिक बांधकामांना नोटीस

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर पीएमआरडीएचा अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग सक्रिय झाला आहे. त्यानुसार पीएमआरडीएच्या हद्दीतील अनधिकृत बांधकामांच्या विरोधात कारवाई सुरू करण्यात येणार आहे. आतापर्यंत सुमारे दहा हजार अनधिकृत बांधकामांना नोटीस दिली आहे. तसेच, पाच ठिकाणी अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासोबतच नऊ तालुक्यातील अनधिकृत होर्डिंगवरही कारवाई करण्यात येणार आहे.

पीएमआरडीए अंतर्गत नऊ तालुक्यातील ८१६ गावांचा समावेश होतो. या गावांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे सुरू आहेत. त्यापैकी सर्वाधिक बांधकामे ही गहुंजे, मारुंजी, हडपसर, वाघोली, तळेगाव या गावामध्ये मोठ्या प्रमाणात बांधकामे झालेली आहेत. दरम्यान, प्राधिकरणाकडून नेमण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी या ठिकाणी पाहणी करून संबंधित बांधकामधारकांना नोटीस दिली आहे.



### हॉटेल्स आणि होर्डिंगवरही होणार कारवाई

» प्राधिकरणाच्या वतीने हद्दीतील अनधिकृत हॉटेल्स, पब या विरोधात कारवाई सुरू होती. जवळपास पंचवीसपेक्षा अधिक हॉटेलवर कारवाई करण्यात आली होती. मात्र, या ठिकाणाची अधिकाऱ्याची बदली झाल्याने त्यानंतर ती थंडावली होती. तसेच अनधिकृत होर्डिंगवरदेखील कारवाई करण्यात येणार सांगण्यात आले.

मात्र तरीदेखील बांधकाम सुरू असल्याचे निदर्शनास आलेले आहे. या अनुषंगाने आता कारवाई करण्यात येणार आहे. महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील मालमत्ताधारकांनी परवानगी घेऊनच आपली बांधकामे करावीत, यासह चालू असलेली अनधिकृत बांधकामे तत्काळ थांबवावीत, असे आवाहन करण्यात येते. मात्र, हे आदेश धुडकावल्याने विविध पाच ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

> निवडणुकीचे कामकाज नुकतेच संपले आहे. त्यानंतर या विभागातील अधिकारी दोन दिवसात कामावर येतील. याबाबत स्वतंत्र बैठक घेण्यात आली असून, महानगर आयुक्तांच्या आदेशानुसार लवकरच पुढील कारवाई करण्यात येणार आहे.
> - डॉ. दीप्ती सूर्यवंशी, सह-आयुक्त, अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग

त्याचप्रमाणे आणखी काही गावांमध्ये येत्या काळात तीन गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. संबंधित पोलीस ठाण्यामध्ये त्याबाबत अर्ज दिला आहे. पोलिसांकडून लवकरच गुन्हा दाखल करण्यात येणार आहे, अशी माहिती महानगर प्राधिकरणातील अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाकडून देण्यात आली.

निवडणुकीचे कामकाज संपल्यानंतर टप्प्या-टप्प्याने अधिकारी पुन्हा येत आहेत. या विभागातील जवळपास निम्म्याहून अधिक स्टाफ निवडणूक कामांमध्ये गुंतला होता. त्यामुळे पुढील आठवड्यापासून कारवाईच्या अनुषंगाने बैठक होणार आहे. त्यानंतर लगेच कारवाई हाती घेण्यात येणार आहे. अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागामध्ये आणखी काही कर्मचारी कंत्राटी म्हणून नेमणूक करणार आहे. तसेच, स्टाफदेखील वाढवण्यात येणार आहे. बांधकाम कारवाईसाठी पोलीस बंदोबस्त मिळत नसल्याने ते थांबले होते. मात्र निवडणुकीनंतर आता बंदोबस्त मिळणे सोपे जाणार आहे.

# महाविकासचे पराभूत उमेदवार ईव्हीएम विरोधात जाणार

## महाविकास आघाडीचे पुणे शहरातील पराभूत उमेदवार ईव्हीएममधील कथित गैरव्यवहाराविषयी पुढील आठवड्यात उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार

**पुणे | प्रतिनिधी**

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचे पुणे शहरातील पराभूत उमेदवार ईव्हीएममधील कथित गैरव्यवहाराविषयी पुढील आठवड्यात उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याची माहिती राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी दिली.




### आमचे नेते पाडण्यासाठी रडीचा डाव

» महायुतीने जयंत पाटील व रोहित पवार यांच्यासारखे आमचे नेते पाडण्यासाठी रडीचा डाव केला. आमची विनंती ईव्हीएम मशीन अधिक चांगले करा आणि जर ते हॅक होत असेल तर पुन्हा बॅलेट पेपरकडे वळावे अशी आहे. निवडणूक आयोगाने आम्ही उपस्थित करत असलेल्या प्रश्नावर खुलासा करावा, अन्यथा देशात लोकशाही अस्तित्वात राहणार नाही. देशातील आघाडीच्या नेत्यांनीही बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्याची मागणी केली आहे, असे जगताप यांनी सांगितले.

विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम मशीनमध्ये झालेल्या कथित गडबडीबाबत पुणे शहरातील महाविकास आघाडीच्या सर्व पराभूत उमेदवारांनी बुधवारी ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. असीम सरोदे यांच्याशी चर्चा केली. याप्रसंगी शिरूरचे माजी आमदार अशोक पवार, माजी गृह राज्यमंत्री रमेश बागवे, प्रशांत जगताप, सचिन दोडके, दत्ता बहिरट, प्रवक्ते अंकुश काकडे, अभय छाजेड, संजय मोरे उपस्थित होते. यावेळी ईव्हीएम हॅकिंग कशा प्रकारे झाली, याविषयी राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी सादरीकरण केले. यावेळी त्यांनी ईव्हीएम मशीनमधील कथित गैरव्यवहाराविषयी पुढील आठवड्यात उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे सांगितले.

प्रशांत जगताप म्हणाले, निवडणूक काळातील आमचा अनुभव पाहता यावेळी जो निकाल आहे तो जनतेचा कौल नाही. हा पडद्यामागे ईव्हीएम मशीनमध्ये झालेला घोळ आहे. मतदान यंत्रे १५ ते २० टक्के आधीच सेट करण्यात आली होती. ईव्हीएम मशीनमध्ये तीन युनिट असतात. ईव्हीएम मशीन मतदान केंद्रात येईपर्यंत एकदा इंटरनेटशी जोडून चिन्ह जोडले जाते. पूर्वी बॅलेट पेपरमध्ये सर्व पारदर्शकता होती. पण ईव्हीएम मशीन २० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी नऊ ते दुपारी चार पर्यंतचा एका दिवसाचा प्रोग्राम आधीच सेट केला होता.

त्यामुळे आम्ही व्हीव्हीपॅटमधील मते आम्ही मोजणार आहोत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि शिवसेना पक्ष फोडण्याची जबाबदारी ज्या पडद्या मागील एका नेत्याला दिली. त्याच नेत्याच्या मदतीने आता इस्त्रायलच्या तंत्रज्ञानाने ईव्हीएम मशीनमध्ये बिघाड करून गैरप्रकार करण्यात आला. मतदान सुरू असताना ईव्हीएम मशीनमध्ये बिघाड करण्यासाठी काही यंत्रणा पडद्यामागे कार्यरत होत्या.